**ठळक बातम्या**

- भगवान गौतम बुद्धांचं ज्ञान, त्यांनी दाखवलेला मार्ग हा संपूर्ण मानवतेचा आणि कालातीत असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त देशाची आदरांजली

- छत्तीसगड मध्ये दोन वेगवेगळ्या ठिकाणी सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत एकूण १४ माओवादी ठार

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेसाठी कोलकाता नाईट रायडर्स संघाने बांगलादेशी खेळाडू मुस्तफिजूर रहमान याला संघातून वगळावं असे क्रिकेट नियामक मंडळाचे निर्देश

**आणि**

- अभाविपचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अशोक मोडक यांचं निधन

**<><><><><>**

भगवान गौतम बुद्धांचं ज्ञान, त्यांनी दाखवलेला मार्ग हा संपूर्ण मानवतेचा आणि कालातीत आहे. भगवान बुद्ध सर्वांचे आहेत आणि ते सर्वांना जोडून ठेवतात, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. नवी दिल्लीतल्या राय पिथोरा सांस्कृतिक संकुलात, भगवान बुद्धांशी संबंधित, पवित्र पिप्रावा अवशेषांच्या, भव्य आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. सव्वाशे वर्षांच्या प्रतीक्षेनंतर हे अवशेष भारतात परत आल्याबद्दल प्रधानमंत्र्यांनी आनंद व्यक्त केला.

***होल्ड... बाईट- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी***

हे अवशेष भारताबाहेर नेणाऱ्यांसाठी त्या फक्त निर्जीव वस्तू होत्या, म्हणून या वस्तूंचा लिलाव करायचा प्रयत्न त्यांनी केला, पण भारतानं तसं होऊ न देता भगवान बुद्धांच्या कर्मभूमीत हे अवशेष परत आणले, असं प्रधानमंत्री म्हणाले. भगवान बुद्धांशी संबंधित विविध ठिकाणी असलेले त्यांचे अवशेष म्हणजे त्यांच्या

संदेशाचं जिवंत प्रतीक आहे, असं त्यांनी सांगितलं. भारताने हे अवशेष विज्ञान आणि अध्यात्म या दोन्ही दृष्टींनी सांभाळून ठेवले आहेत, तसंच जगभरात अशा प्रकारच्या ठिकाणांच्या विकासासाठी शक्य होईल ते योगदान देण्याचा भारताचा प्रयत्न आहे, असंही प्रधानमंत्र्यांनी नमूद केलं.

केंद्रीय मंत्री गजेंद्र सिंह शेखावत, किरेन रिजिजू, रामदास आठवले, दिल्लीचे नायब राज्यपाल विनय कुमार सक्सेना, दिल्ली सरकारमधले मंत्री, बौद्ध धर्माचे प्रतिनिधी आणि इतर यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

२०२५ मधे भारताच्या प्रगतीने जगाचं लक्ष वेधून घेतलं. जगभरात अनिश्चिततेचं वातावरण असताना भारत मात्र आपल्या ध्येयाकडे ठामपणे आणि सातत्यपूर्ण वाटचाल करत राहिला. या विषयी सविस्तर माहिती आता ऐकुया…

-----------------व्हीसी----------------

*भारतीय समाजात चीन, अमेरिका, जी सेवन देश आणि जी ट्वेंटी देशांपेक्षा अधिक समता असून विविध वर्गांच्या उत्पन्नातील तफावत कमी असल्याचं जागतिक बँकेने म्हटलं आहे. कल्याणकारी योजना, थेट लाभाच्या योजना यामुळे आर्थिक समानता स्थापन व्हायला मदत झाली. भारतातील सामाजिक संरक्षण कव्हरेज २०२५ मधे ६४ पूर्णांक ३ दशांश टक्क्यापर्यंत वाढलं. याचा लाभ जवळपास ९४ कोटी नागरिकांना मिळतो. आर्थिक स्थिरता, संरचनात्मक सुधारणा, मजबूत सार्वजनिक वित्त पुरवठा यामुळे जागतिक गुंतवणूकदारांमधे भारताविषयीचा विश्वास वाढीस लागल्याचं बेटर बिझनेस ब्युरो या संस्थेच्या अहवालात म्हटलं आहे. तसंच यूपीआय ही जगातली सर्वात मोठी रिअल टाईम पेमेंट सिस्टम असून भारत हा जगाच्या प्रगतीचं इंजिन आहे असा गौरव आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने केला. तर अमूर्त मालमत्ता गुंतवणुकीत भारत हा जगातली सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था असल्याचं जागतिक बौद्धिक संपदा संस्थेनं म्हटलं आहे.*

आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
३ जानेवारी २०२५ - शनिवार

**<><><><>**

स्त्रीशिक्षणाच्या प्रणेत्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमीत्त आज राज्यासह देशभरातून त्यांना अभिवादन करण्यात येत आहे, तसंच या निमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सावित्रीबाई फुले यांना त्यांच्या जयंतीनिमित्त आदरांजली वाहिली आहे. सावित्रीबाई फुले यांनी सेवा आणि शिक्षणाच्या माध्यमातून समाजात परिवर्तन घडवण्यासाठी आपलं संपूर्ण आयुष्य समर्पित केलं. समता, न्याय आणि करुणा या मूल्यांप्रती त्यांची अतूट बांधिलकी होती, समाजातल्या वंचित आणि दुर्बल घटकांच्या सेवेसाठी त्यांनी केलेलं  कार्य प्रेरणादायी आहे, असं प्रधानमंत्र्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. तर स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या, भारतातल्या पहिल्या महिला शिक्षिका 'क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले' यांना जयंतीदिनी कोटी कोटी वंदन अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अभिवादन केलं आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही सावित्रीबाई फुले यांना  आदरांजली वाहिली आहे.

**<><><><>**

छत्तीसगड मध्ये आज दोन वेगवेगळ्या ठिकाणी सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत एकूण १४ माओवादी मारले गेले. सुरक्षा दलांच्या नक्षलवाद विरोधी मोहिमेला वर्षाच्या सुरुवातीलाच आलेलं हे मोठं यश  मानलं जात आहे. यापैकी बस्तर भागात बिजापूर जिल्ह्यात दोन आणि सुकमा जिल्ह्यात १२ माओवादी मारले गेले. बिजापूर मध्ये बासुगुडा भागात माओवादी असल्याची माहिती मिळताच पोलिसांचं पथक तिथं तातडीनं रवाना झालं. त्यानंतर गगनपल्ली गावाजवळ दोन्ही बाजूंनी झालेल्या गोळीबारात दोन माओवादी मारले गेले. त्याचप्रमाणे सुकमा जिल्ह्यातही पोलिसांच्या कारवाईत १२ जण मारले गेले. सुरक्षा दलांनी चकमकीच्या ठिकाणाहून सर्व माओवाद्यांचे मृतदेह ताब्यात घेतले आहेत. याशिवाय,

घटनास्थळावरून एक एके-४७ रायफल, एक एसएलआर रायफल आणि इतर शस्त्रंही जप्त करण्यात आली आहेत.

<><><><><>

महाराष्ट्राच्या पहिल्या महिला पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला आज सेवानिवृत्त झाल्या. पोलीस दलात साडे ३७ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करणाऱ्या शुक्ला यांना मुंबईत भोईवाडा इथल्या पोलीस मैदानात मानवंदना देण्यात आली. त्यानंतर शुक्ला यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वर्षा निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. त्यांच्या यशस्वी कारकिर्दीबद्दल मुख्यमंत्र्यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

राज्याचे नवनियुक्त पोलीस महासंचालक सदानंद दाते यांनी आज रश्मी शुक्ला यांच्याकडून आपल्या पदाचा कार्यभार हाती घेतला. तत्पूर्वी त्यांनीही मुख्यमंत्र्यांची सदिच्छा भेट घेतली. त्यांच्या नियुक्तीबद्दल अभिनंदन करत मुख्यमंत्र्यांनी त्यांना कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

<><><><><>

२०२६ च्या आयपीएल क्रिकेट स्पर्धेसाठी कोलकाता नाईट रायडर्स संघाने बांगलादेशी खेळाडू मुस्तफिजूर रहमान याला संघातून वगळावं असं बीसीसीआय अर्थात भारत क्रिकेट नियामक मंडळाने सांगितलं आहे. केकेआरने रहमानला आयपीएलच्या लिलावात ९ कोटी वीस लाख रुपयांना खरेदी केलं आहे. बांगलादेशात एका हिंदू तरुणाची हत्या झाल्याच्या पार्श्वभूमीवर बांगलादेशी खेळाडूला आयपीएलमधे घेण्यावरून वाद सुरू झाला आहे. त्यामुळे बीसीसीआयने बांगलादेशी खेळाडूला वगळण्यास सांगितलं आहे, या खेळाडूच्या ऐवजी दुसरा खेळाडू निवडण्याची संधी केकेआर संघाला मिळणार आहे.

<><><><><>

भारत आणि बांगलादेश यांच्यात गेल्या वर्षी नियोजित असलेली मर्यादित षटकांच्या सामन्यांची क्रिकेट मालिका यावर्षी सप्टेंबर महिन्यात होईल, असं

बांगलादेश क्रिकेट मंडळाने सांगितलं आहे. मात्र याचं वेळापत्रक निश्चित नाही. गेल्यावर्षी बांगलादेशात उफाळलेल्या हिंसाचारानंतर प्रधानमंत्री शेख हसिना भारतात आल्या, त्यानंतर दोन्ही देशा दरम्यान तणाव वाढला. दोन्ही देशांनी परस्परांच्या उच्चायुक्तांकडे परस्परांच्या देशातल्या परिस्थितीविषयी चिंता व्यक्त केली. या परिस्थितीमुळे दोन्ही देशां दरम्यान होणारी क्रिकेट मालिका खोळंबली आहे.

**<><><><><>**

ज्येष्ठ शिक्षण तज्ज्ञ, अखिलभारतीय विद्यार्थी परिषदेचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अशोक मोडक यांचं काल मुंबईत निधन झालं. ते ८५ वर्षांचे होते. गेलं वर्षभर ते कर्करोगाशी झुंज देत होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ते समर्पित कार्यकर्ते होते. राज्यातल्या विविध नामांकित महाविद्यालयांमधे अध्यापन क्षेत्रात ठसा उमटवणारे डॉ मोडक सोविएत रशियासंदर्भातले तज्ज्ञ होते. बिलासपूर इथल्या गुरु घासीदास केंद्रीय विद्यापीठाचे कुलपती म्हणून त्यांनी काम केलं होतं. विविध विषयांवरची ४० पुस्तकं त्यांनी लिहीली होती. १९९४ ते २००६ अशी सलग १२ वर्षं त्यांनी विधानपरिषदेत पदवीधर मतदारसंघाचं प्रतिनिधित्व केलं.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अशोक मोडक यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं असून आदरांजली वाहिली आहे. विविध क्षेत्रातल्या मान्यवरांनी मोडक यांच्या निधनाबद्दल हळहळ व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**